**कलम ४ (१)(ख)(१)**

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्ये व कर्तव्ये

**१) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग :—** राज्य शासन/निमसरकारी विभाग आणि मान्यता प्राप्त सरकारी विभाग यामध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराला नष्ट करण्यासाठी/प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र शासन, गृह विभाग निर्णय क्र. ACB 1857/C-3019-V, date 26 Nov. 1957 अन्वये महाराष्ट्र राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली.

**''महासंचालक''** हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रमुख असून ते पोलीस महासंचालक दर्जाचे आहेत. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हे महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक पासून स्वतंत्र आहेत व गृह विभागाच्या सरळ प्रशासकीय नियंत्रणाखाली ते काम करतात. महासंचालक यांच्या मदतीला २ अपर महासंचालक, १ अपर पोलीस आयुक्त, ७ पोलीस अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दर्जाचे १ उपसंचालक, वन विभागाच्या विभागीय वन अधिकाऱ्याच्या दर्जाचे १ उपसंचालक, महसूल विभागाच्या अपर जिल्हाधिकारी दर्जाचे १ उपसंचालक आणि विक्रीकर विभागाच्या उप आयुक्त दर्जाचे १ उपसंचालक असे ४ उपसंचालक नेमलेले आहेत. अपर सरकारी अभियोक्ता दर्जाचा १ सरकारी अभियोक्ता विधी सल्लागार म्हणून नेमलेला आहे. सदर ७ पोलीस अधीक्षक हे राज्यातील ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नांदेड या परिक्षेत्रांचे प्रमुख असून अपर पोलीस आयुक्त हे मुंबई परिक्षेत्राचे प्रमुख आहेत.

**२) कार्ये :—** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची मुख्य कार्ये पुढील प्रमाणे.....

**अ)** लाचेचे गुन्हे उघडकीस आणणे व कलम ७ ते १५ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (सन १९८८ चा अधिनियम ४९) अन्वयेच्या गुन्हयांचा तपास करणे.

**ब)** लोकांच्या किंवा शासकीय अधिकाऱ्यांच्या किंवा लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडून लाच, भ्रष्टाचार, गुन्हेगारी गैरवर्तन, सरकारी नोकरांकडून झालेला सरकारी रकमेचा अपहार यासंबंधात प्राप्त झालेल्या तक्रारींवर चौकशी स्थापन करणे.

**३) कर्तव्ये :—** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये —

**अ)** सरकारी नोकराने लाच घेणे व बेकायदेशीर संपत्ती गोळा करणे यासंबंधात माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.

**ब)** सरकारी नोकराने लाच घेताना त्यास पकडण्यासाठी सापळे रचणे.

**क)** महासंचालक व इतर पर्यवेक्षक अधिकाऱ्यांच्या निदेशांनुसार तक्रारींसंबंधात चौकशी व तपास करणे.

| माहिती अधिकार अधिनिय—२००५ नियम ४ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **प्रशासकीय कार्ये** | **कोठे उपलब्ध आहेत.** |
| १ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम | शासकीय पुस्तक भांडार, चर्नीरोड, मुंबई. |
| २ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम (अपील व शिस्त) (वर्तणूक) १९७९ | |
| ३ | आर्थिक नियम | |
| ४ | महाराष्ट्र आकस्मित खर्च नियम | |
| ५ | महाराष्ट्र अंदाजपत्रक नियमावली | |
| ६ | महाराष्ट्र कोष नियम | |
| ७ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग निर्देशांची नियमावली | फक्त कार्यालयांतर्गत वापरासाठी. |

| अ.क्र. | कार्यकारी प्रशासनाची कार्ये | कोठे उपलब्ध आहे |
|---|---|---|
| १ | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ | सदर पुस्तक कार्यालयात वाचनासाठी उपलब्ध करुन दिले जाईल. |

कलम ४ (१)(ख) (१) ‘‘नमुना— क’’

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अधिकार कक्षा

### क) आर्थिक अधिकार

| अ.क्र. | पद | अधिकार | कोणता अधिनियम/नियमानुसार | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई | लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रमुख | अर्थ विभाग, शासन निर्णय क्र. वअप्र—२०१३/प्र.क्र.३० /२०१३, विनियम, भाग—२ दि. १७/०४/२०१५ | — |
| २ | अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई | कार्यालयाचे परिक्षेत्रीय प्रमुख | | |
| ३ | अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | कार्यालय प्रमुख | | |
| ४ | आहरण व संवितरण अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | कार्यालय प्रमुख | | |

### ख) प्रशासकीय अधिकार

| अ.क्र. | पद | अधिकार | कोणता अधिनियम/नियमानुसार | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | महासंचालक,ला.प्र.वि., महाराष्ट्र राज्य, मुंबई | लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रमुख | गृह विभाग, शासन निर्णय क्र. ACB/1857/C-3019-V, dated 07th April, 1959. | |
| २ | अपर महासंचालक | कार्यालयाचे परिक्षेत्रीय प्रमुख | अर्थ विभाग, शासन निर्णय क्र. वअप्र— २०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग— २ दि. १७/०४/२०१५ आर्थिक अधिकार नियम, १९७८, Part-I, Sub-Part-II, Annexure Sr.No.2, Rule 2 & HD order No. ACB 0503/CR13/Pol-2, dated 08/09/2003 | |
| ३ | अपर महासंचालक (उन्नत पद) | कार्यालयाचे परिक्षेत्रीय प्रमुख | अर्थ विभाग, शासन निर्णय क्र. वअप्र—२०१३/प्र.क्र.३० /२०१३ विनियम, भाग— २ दि. १७/०४/२०१५ आर्थिक अधिकार नियम, १९७८, Part-I, Sub-Part-II, Annexure Sr.No.2, Rule 2 & HD order No. ACB 0503/CR13/Pol-2, dated 08/09/2003 | |
| ४ | अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय, ला.प्र.वि., महाराष्ट्र राज्य, मुंबई. | कार्यालय प्रमुख | अर्थ विभाग, शासन निर्णय क्र. वअप्र—२०१३/प्र.क्र.३० /२०१३ विनियम, भाग—२ दि. १७/०४/२०१५ | |